भा.कृ.अनु.प.– राष्ट्रीय अनार अनुसंधान केन्द्र, सोलापुर
ICAR - National Research Centre on Pomegranate
(Indian Council of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255 (M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263,F-(0217) 2353533
E mail- nrcpomegranate@gmail.com, www.nrcpomegranate.icar.gov.in
(ISO 9001:2008 Certified Institute)

# लागवडीसाठी रोपे निवडताना घ्यायची काळजी

- नवीन किंवा अपारंपारिक क्षेत्रातील नवीन फळबागा लागवडीसाठी नेहमी टिश्यू कल्चर (TC) रोपे वापरली पाहिजेत.
- टिश्यू कल्चर उत्पादित रोपे रोगमुक्त असतात म्हणून नवीन क्षेत्रामध्ये तेलकट डाग रोग, बुरशीजन्य मर रोग व  मुळांवर गाठी बनवणारा सूत्रकृमी पसरण्यास प्रतिबंध होतो.
- पारंपारिक डाळिंब पिकवणाऱ्या भागात जेथे जवळच्या डाळिंब बागांमद्धे तेलकट डाग रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला आहे आणि तुमच्या जवळपास डाळिंबाची लागवड असेल, तर खात्रीशीर नर्सरी वा व्यक्तीकडून गुटी पद्धती किंवा हार्डवुड कटिंग्जद्वारे उत्पादित रोगमुक्त झाडे निवडावीत.

## टिश्यू कल्चर किंवा एअर लेयर (गुटी) अथवा हार्डवुड कटिंग यापैकी कोणती रोपे लागवडीसाठी चांगली असतात?

- योग्यरित्या वाढवलेली टिश्यू कल्चर उत्पादित रोपे चांगले उत्पन्न देतात किंवा पारंपारिक लागवड सामग्रीइतकी चांगली असतात. कोणत्या भागामध्ये डाळिंब लागवड करणार आहे, त्यानुसार टिश्यू कल्चर किंवा एअर लेयर (गुटी) ची रोपे निवडावीत.

## नवीन क्षेत्रात डाळिंबाची बाग लावण्यासाठी कोणत्या लागवड सामग्रीची शिफारस केली जाते?

- नवीन किंवा अपारंपारिक क्षेत्रातील नवीन फळबागा लागवडीसाठी नेहमी टिश्यू कल्चर (TC) रोपे वापरली पाहिजेत.
- टिश्यू कल्चर उत्पादित रोपे रोगमुक्त असतात म्हणून नवीन क्षेत्रामध्ये तेलकट डाग रोग पसरण्यास प्रतिबंध होतो .
- पारंपारिक डाळिंब पिकवणाऱ्या भागात, तेलकट डाग / ब्लाइट रोगकारक (झॅन्थोमोनास ऍक्सोनोपोडिस पीव्ही. प्युनिके) हा जिवाणू रोगग्रस्त बागा/क्षेत्रात तयार केलेल्या रोपांच्या नोड्स आणि हार्डवुड कटिंग्जमध्ये सुप्त संसर्ग म्हणून प्रवेश करून ६ ते ८ महीने रोगाची लक्षणे न दिसता राहू शकतो.

- या जिवाणू बरोबरच इतर महत्त्वाचे रोगकारक जसे मर रोग (विल्ट) बुरशी (*Ceratocystis fimbriata*) आणि मुळांवर गाठी बनवणारा सूत्रकृमी (रूट-नॉट नेमाटोड), *Meloidogyne incognita* रोपांसोबत आणि हे रोपांसाठी पिशव्यात भरलेल्या मिश्रणात वापरल्या जाणाऱ्या रोगग्रस्त मातीतून पसरू शकतात.
- पारंपारिक डाळिंब पिकवणाऱ्या भागात जेथे जवळच्या डाळिंब बागांमध्ये तेलकट डाग रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला आहे आणि तुमच्या जवळपास डाळिंबाची लागवड असेल, तर खात्रीशीर नर्सरी वा व्यक्तीकडून गुटी पद्धती किंवा हार्डवुड कटिंग्जद्वारे उत्पादित रोगमुक्त झाडे निवडावीत.

**NRCP लागवडी साठी रोपे पुरवते का? जर होय, टिश्यू कल्चर किंवा एअर लेयर/हार्डवुड कटिंग? कृपया बुकिंगची प्रक्रिया आणि दर सांगा.**

- NRCP स्वतः लागवडी साठी रोपे पुरवीत नाही. NRCP कडून टिश्यू कल्चर तंत्रज्ञान घेतलेल्या खाजगी भागीदार शेतकऱ्यांना लागवडी साठी रोपे पुरवतात.

**रोगमुक्त रोपांसाठी चांगली रोपवाटिका कशी निवडावी?**

- आम्ही रोपवाटिका प्रमाणिकरणाचे काम करत नाही. रोगमुक्त रोपे मिळवण्यासाठी खालील बाबींचा अवलंब करावा.
- रोपवाटिकेला शासनाचे प्रमाणीकरण आहे का हे तपासून पहावे.
- जर नवीन लागवड करायची असेल तर विशेषत: जून-ऑक्टोबर महिन्यात शेतकऱ्यांनी रोपवाटिकेला भेट द्यावी व रोपे तयार करण्यासाठी वापरलेल्या मातृवृक्षांची वाढ आणि तेलकट डाग रोगासाठी तपासणी करावी, कारण नवीन रोपवाटिकांमध्ये कमीतकमी 5-8 महिने तेलकट डाग रोग / ब्लाइटचा संसर्ग दिसून येत नाही.
- मातृवृक्षांची पाहणी करताना पानांवर, फळांवर आणि मुख्य खोड व फांद्यांवर तेलकट डाग रोगाच्या जखमा आहेत का याची तपासणी करावी.




**फोटो १: तेलकट डाग रोगाची लक्षणे: a & b) पाने; c,d & e ) नवीन फांद्या व मुख्य खोडावरील जखमा f & g) फळांवरील लक्षणे**

- मातृवृक्ष असलेल्या बागेत मर रोग आहे का ते पहावे. मर रोगाचे प्रमुख लक्षण हे ओळीने किंवा एका जागेतील झाडे सुरवातीला पिवळी पडतात, काही फांद्या सुकून जाणे व संपूर्ण झाड मारून जाते. ती मर रोगाची झाडे जरी काढून टाकलेली असली तरी बागेमद्धे काही भाग मोकळा पाहायला मिळतो.



**फोटो 2: डाळिंब बागेत मर रोग असल्याची लक्षणे**

- खरेदी करावयाच्या रोपवाटिकेतील रोपांच्या पिशव्या भरण्यासाठी निर्जंतुकीकरण केलेली माती वापरली पाहिजे.
- मुळांवर गाठी बनवणारा सूत्रकृमी (नेमाटोड गॉल्ससाठी) याचा प्रादुर्भाव तयार केलेल्या रोपांमद्धे आहे का यासाठी काही रोपांची मुळे तपासावीत.
- चांगली मुळांची वाढ झालेली किंवा 5-6 महिने जुनी रोपे पिशव्यामध्ये खरेदी करावीत. त्याअगोदर एच्छिकपणे ५ ते १० रोपांची तपासणी करावी. पिशवीमधील मिश्रण मुळांपासून वेगळे करून त्या झाडांची मुळे पाण्यात स्वच्छ करावीत व मुळांवर खालीलप्रमाणे गाठी आहेत का ते पहावे.



- अश्या गाठी असल्यास त्या रोपवाटीकेतील रोपे घेऊ नयेत.
- झाडांची चांगली जोमदार वाढ असावी आणि रोगाची लक्षणे नसलेली असावी. उपलब्ध असल्यास नेहमी जैव-कठोर लागवड सामग्रीला प्राधान्य द्या.